# Washim District Police

**Nature of Work** :- **Raid on Ganja**

**Police Station** :- **Mangrupir**

**Date of Good Work done** :- **26/09/2020**

**Brief of the work done :-**

दीड लाखांचा गांजा जप्त; एकास अटक करण्यात आली. दि. २६/०९/२०२०

## पोलिसांनी केला दीड लाखांचा गांजा जप्त

### आरोपीस अटक



**मंगरुळपीर** ■ तालुका प्रतिनिधी

पोलिसांनी तालुक्यातील पिंपळखुटा संगम या गावानजीक २५ सप्टेंबर रोजी एका आरोपीकडून दीड लाख रुपयांचा गांजा जप्त केला आहे. तसेच आरोपीस अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की, मंगरुळपीर ते पिंपळखुटा संगम मार्गावरून तऱ्हाळा येथे एक जण एका वाहनात गांजा घेऊन जाणार आहे. अशा माहितीवरून, पोलिसांनी पिंपळखुटा संगम या गावाजवळ सापळा रचला. यावेळी दुपारी साडेचार वा.च्या दरम्यान पांढऱ्या रंगाची इंडिका अडवून आरोपी सलीम खान असद खान वय ४५, रा. तऱ्हाळा याचेकडून १ लाख ४० हजार रुपये किंमत असलेला १३,७०० कि.ग्रॅ. गांजा व अडीच लाख रुपयांचे वाहन असा एकूण ३ लाख ९० हजार रुपयांचा माल जप्त केला. तसेच सरकारी पंच शंकर शिंदे, विकास वानखडे यांचे समक्ष पंचनामा करून आरोपीस अटक करण्यात येऊन त्याचेवर अंमली पदार्थ कायद्यानुसार गुन्हा दाखल केला. यावेळी ठाणेदार धनंजय जगदाळे यांचे मार्गदर्शनात हेकॉ ज्ञानेश्वर राठोड, नापोकॉ सुनील गंडाईत, अमोल मुंदे, पोकॉ सचिन शिंदे, महंमद परसुवाले, संदिप खडसे, अनंता डोलसे, विठ्ठल उगले, होमगार्ड उचीत, कर्पे आदींनी ही कारवाई केली.

ePaper देशोन्नती
Sat, 26 September 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/55234488